485

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २६/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.,एसायएस-१२२/प्र.क्र.४००/पोल-७ दि.२४ डिसेंबर-२०२४

**विषय :-** Extended Special Infrastructure Scheme (SIS),including construction of fortified Police Stations in LWE affected states" या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर झालेल्या " Fortified Police Stations " यांचे बांधकाम करणे या योजनेसाठी निधी वितरण करण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.,एसायएस-१२२/प्र.क्र.४००/पोल-७, दिनांक २४ डिसेंबर- २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२२४१३२१४७९४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपूर.
पोलीस अधीक्षक,गडचिरोली/गोंदिया
कार्यासन अधिकारी का.क्र.२७

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक (नि.व स.),महाराष्ट्र राज्य ,मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व स.) महाराष्ट्र राज्य ,मुंबई

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**Extended Special Infrastructure Scheme (SIS), including construction of Fortified Police Stations in LWE affected States" या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर झालेल्या "Fortified Police Stations"यांचे बांधकाम करणे या योजनेसाठी निधी वितरण करण्याबाबत....**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्र. एसआयएस-११२२/प्र.क्र.४००/पोल-७.**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक - २४ डिसेंबर, २०२४.

**संदर्भ** :- १. भारत सरकार, गृह मंत्रालय, फा. क्र. १८०१५/१५/२०२२-LWEO-II, दि.३०.०८.२०२२, दि.७.१०.२०२२, दि.२१.०३.२०२३ and दि.०६.०२.२०२४.

२. शासन निर्णय क्र. बांधका-०७२४/प्र.क्र.१८१/ पोल-७, दि.१४.१०.२०२४.

३. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांचे पत्र, जा.क्र.गपग/डी-८/हिवाळी अधिवेशन/विविपाभुयो अनुदान मागणी/२०२४-२६६८ गडचिरोली परिक्षेत्र, दि. १३.११.२०२४.

**शासन निर्णय :-**

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या "Extended Special Infrastructure Scheme (SIS), या योजनेखाली, दिनांक २५.०१.२०२३ रोजी झालेल्या प्रोजेक्ट क्लीअरन्स कमिटीच्या बैठकीमध्ये केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारीत आराखडा महाराष्ट्र राज्यासाठी "14 Fortified Police Stations, SIB/SF and District Police Works" या कामांसाठी उक्त संदर्भ क्र. १ मधील दिनांक २१ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आराखड्यास मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | तपशिल | मंजूर रक्कम |
|---|---|---|
| १. | नक्षलग्रस्त भागातील १४ पोलीस ठाण्याचे बळकटीकरण (रु.२.५ कोटी प्रति पोलीस ठाणेच्या मर्यादेत.) | ३५,००,००,०००/- |
| २. | SIB/SF कामांसाठी | १५,६३,९०,०००/- |
| ३. | जिल्हा पोलीस कामांसाठी | ६,९१,५०,०००/- |
| | **एकूण** | **५७,५५,४०,०००/-** |

२. तसेच, विस्तारित विशेष पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत दिनांक ३१/०१/२०२४ रोजी झालेल्या केंद्र शासनाच्या प्रोजेक्ट क्लिअरंस कमिटीच्या (PCC) बैठकीमध्ये मंजूर झालेल्या पोमके गर्देवाडा व पोमकें पेनगुंडाच्या बांधकामास दि. १४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

३. सदर योजनेंतर्गत खर्चासाठी चालू आर्थिक वर्षात २०२४-२५ मधील अर्थसंकल्प मुख्यलेखाशिर्ष ४०५५०२०५(केंद्र हिस्सा) व ४०५५०२१४(राज्य हिस्सा) या लेखाशीर्षाखाली अनुक्रमे रु.१२,००,००,०००/- व रु.८,००,००,०००/- असा एकूण रु.२०,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

४. विधीमंडळाच्या डिसेंबर-२०२४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये, पुरक मागणीद्वारे, विस्तारीत विशेष पायाभूत सुविधा (Special Infrastructure Scheme) योजने अंतर्गत रु.९,०९,६६,१६७/- (अक्षरी रूपये नऊ कोटी नऊ लाख सहासष्ठ हजार एकशे सदुसष्ठ फक्त) एवढे पूरक अनुदान मंजुर करण्याची विनंती पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी केली आहे.

५. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सदर उपलब्ध निधीमधून उपरोक्त नुसार पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी मागणी केलेल्या रकमेची पुर्तता करणे शक्य आहे. सबब, पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी मागणी केलेल्या रु. ९,०९,६६,१६७/-(अक्षरी रूपये नऊ कोटी नऊ लाख सहासष्ठ हजार एकशे सदुसष्ठ फक्त) इतक्या निधीच्या वितरणाची विनंती वित्त विभागास केली होती.

६. वित्त विभागाने उपरोक्त लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पित निधी १०० टक्के प्रमाणात वितरीत केला आहे.

७. वित्त विभागाने वितरीत केलेल्या रकमेपैकी पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी मागणी केल्यानुसार केंद्र हिश्याची रक्कम रु. ५,४५,७९,७००/- (रुपये पाच कोटी पंचेचाळीस लाख एकोणसत्तर हजार सातशे फक्त) व राज्य हिश्याची रु.३,६३,८६,४६७/- (रुपये तीन कोटी त्रेसष्ट लाख शहाऐंशी हजार चारशे सदुसष्ट फक्त) इतकी रक्कम पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली, यांना पीएफएमएस प्रणालीद्वारे वितरण करण्यास याद्वारे, पुढील अटींवर, मंजुरी देण्यात येत आहे.:-

१. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या "Extended Special Infrastructure Scheme (SIS), या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन करण्यात यावे.
२. संदर्भीय क्र. १ वरील भारत सरकार, गृह मंत्रालय, क्र. १८०१५/१५/२०२२-LWEO-II, दि.२१.०३.२०२३ व दि.०६.०२.२०२४. यामधील शर्तींचे अनुपालन करण्यात यावे.

८. उक्त केंद्र हिश्याचे रु.५,४५,७९,७००/- (रुपये पाच कोटी पंचेचाळीस लाख एकोणसत्तर हजार सातशे फक्त) इतकी रक्कम "गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस (००) (००) (०३) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (६० टक्के केंद्र हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२०५), ५३, मोठी बांधकामे", या लेखाशीर्षाखाली आणि राज्य हिश्याचे रु. ३,६३,८६,४६७/- (रुपये तीन कोटी त्रेसष्ट लाख शहाऐंशी हजार चारशे सदुसष्ट फक्त) इतकी रक्कम "गृह विभाग मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस (००) (००) (०४) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (४० टक्के राज्य हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२१४) ५३-मोठी बांधकामे" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून, चालू वित्तीय वर्षाच्या (सन २०२४-२५) अर्थसंकल्पीत अनुदानातून भागविण्यात यावा.

९. सदर निधी "विशेष पायाभूत सुविधा" या योजनेच्या Single Nodal Agency (SNA) खात्यामध्ये जमा करण्यासाठी याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. "विशेष पायाभूत सुविधा" या योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.:-

**खात्याचे नाव - Special Infrastructure Scheme (SIS) :-**
स्टेट बँक ऑफ इंडिया, मंत्रालय शाखा,
IFSC Code:-SBIN0061524
बँक खाते क्रमांक:- ४१११९४५०८६०.

१०. सदर रक्कम आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव / कक्ष अधिकारी, (रोख शाखा), गृह विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून उप/सह सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

११. हा शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र. ६७३०४१२/२०२४/व्यय-७, दिनांक १०.१२.२०२३, अन्वये मिळालेल्या वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharahstra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१२२४१३२१४७९४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHHAYA NATHU MALI

Digitally signed by CHHAYA NATHU MALI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=cd4e9f6041c76a9f3fd5cbcbc45affce68bbd6f32230f05b4a2b54b875937776, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B20C807A33573110F6D8441C862B04F58811935279DCAD666C42A2FABC6C24E8, cn=CHHAYA NATHU MALI
Date: 2024.12.24 13:23:55 +05'30'

**( छाया न. माळी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली, मुक्काम-नागपूर
३. पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/ गडचिरोली / गोंदिया.
८. अवर सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी (व्यय-७/अर्थ-११/अर्थोपाय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड फाईल (पोल-७), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.